**BDC LIBRARY**
New Paper Clipping
A.Y. 2023-2024

# श्रमसंस्कार शिबिरातून विद्यार्थ्यांवर श्रमाचे संस्कार

## प्रा. डॉ. टी. एम. चौगले यांचे प्रतिपादन, देसाई महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराचे उद्‌घाटन

वार्ताहर
पाटण

श्रमसंस्कार शिबिरे काळाची गरज असून अशा शिबिरातून समाजप्रबोधन करणारे व समाजोपयोगी नवीन उपक्रम विद्यार्थ्यांनी राबवले पाहिजते. श्रमसंस्कार शिबिरातून श्रमाचे संस्कार घडत असतात. संत गाडगेबाबा यांनी स्वच्छतेच्या माध्यमातून केलेल्या मानवतावादी कार्याचा आदर्श विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे, असे मत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे एनएसएस संचालक डॉ. टी. एम. चौगले यांनी व्यक्त केले.




**सलतेवाडी : श्रमसंस्कार शिबिर उद्‌घाटनप्रसंगी बोलताना प्रा. टी. एम. चौगले. समवेत संजीव चव्हाण, प्राचार्य एस. डी. पवार व मान्यवर.**

येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत सलतेवाडी (ता. पाटण) येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण, प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, प्रा. दीपक दाभाडे, प्रा. डॉ. हेमलता काटे, डॉ. जी. एस. पट्टेबहादूर, डॉ. भरत जाधव, सरपंच रुपाली सलते, उपसरपंच अमोल देसाई यांची प्रमुख उपस्थिती होती.

संजीव चव्हाण म्हणाले, श्रमसंस्कार शिबिर विद्यार्थ्यांच्या जीवनावर श्रमाचा संस्कार घडवून आयुष्य घडवत असते. प्राचार्य डॉ. एस. डी. पवार म्हणाले, या शिबिरामध्ये सात दिवस वेगवेगळ्या विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे. ग्रामस्थांच्या सहकार्यातून राबवलेले उपक्रम व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केलेले श्रम गावासाठी महत्त्वाचे ठरतील.

प्रा. डॉ. पट्टेबहादूर यांनी प्रास्ताविक, डॉ. भरत जाधव यांनी आभार मानले. काजल साळुंखे हिने सूत्रसंचालन केले. प्राध्यापक, पोलीस पाटील, ग्रामपंचायत सदस्य, विभागप्रमुख, राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक उपस्थित होते.